International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 12 No.3 Jan-Feb 2025

# प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी संस्कृती विषयक जाणीवजागृती उपक्रम निर्मिती एक अभ्यास

**राठोड स्वाती रामचंद्र[1], डॉ. एम. एम. जोशी[2]**
[1,2] शिक्षणशास्त्र संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड
**Corresponding Author: राठोड स्वाती रामचंद्र**
**DOI- 10.5281/zenodo.14992291**

**सारांश:-**

प्राथमिक स्तरावरील विद्यार्थी समाजातील वाईट घटक व चालीरीती पासून दूर असतो. प्राथमिक स्तरावरून माध्यमिक स्तरावर शारीरिक मानसिक सामाजिक व कौटुंबिक बदल होताना विद्यार्थी विविध घटकांची व विचारांची बौद्धिक स्तरावर शहानिशा करण्याचा प्रयत्न करतो व खऱ्या अर्थाने या कौशल्याचा वापर करताना त्याला समाजातील वाईट काय व चांगले काय प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न किंबहुना या प्रश्नाचे उत्तर त्याला भेटते. यामधून स्वतः विद्यार्थी या प्रश्नाचे उत्तर शोधतात त्यांचे अनुभव मजबूत होतात. विचारधारा चांगली बनते याशिवाय जे विद्यार्थी आपल्या पालकांच्या विचारानुसार किंवा ते सांगतील तेवढेच विचार करणारे विद्यार्थी या दोन प्रकारच्या विद्यार्थ्यांमध्ये फरक आढळतो.

**मुख्य संज्ञा:-** प्राथमिक स्तर, संस्कृती, जाणीव जागृती, उपक्रम इत्यादी.

**प्रस्तावना :-**

सत्कार्य करणे म्हणजेच संस्कृती जोपासणे होय. चांगले कार्य करणे म्हणजे संस्कृती होय. धर्म या मुख्य गोष्टी सह बाह्य सर्व गोष्टींसाठी संस्कृती या शब्दाचा प्रयोग केला आहे. प्रकृती म्हणजे निसर्ग विकृती होय. म्हणजेच निसर्गात होणारा विकार आणि प्रकृतीत विकार होऊ नयेत म्हणून त्यावर करावयाच्या संस्काराला संस्कृती म्हणतात. संस्कृतीमध्ये विविध प्रकारच्या संस्कृती पहावयास मिळतात. संस्कृतीचे अनेक प्रकार आहेत त्यामध्ये ग्रामीण, नागरी, राजकीय व इतर राजकीय व्यवस्थेबद्दल आणि राजकीय विचार याबद्दल समाजातील घटक व त्यांचा कल, भावना, विचार, श्रद्धा व मूल्य यांचा दृष्टिकोन होय. लोकशाही व्यवस्थांच्या स्थैर्यासाठी आवश्यक असलेली राजकीय संस्कृती म्हणजेच नागरी संस्कृती होय.

**महाराष्ट्राची मुख्य संस्कृती :-**

सुसंस्कृत संवाद, श्रद्धा, मूल्य शिष्टाचार, मदत, सहानुभूती या गुणांनीयुक्त महाराष्ट्र संस्कृतीची ओळख आहे.

**राजकीय संस्कृतीची संकल्पना :-**

अलीकडच्या काळात राजकीय अभिचार व धारणा किंवा संस्कृती गढूळ होताना दिसत आहे. परंतु यातील चांगल्या बाबींचा विचार विद्यार्थ्यांसमोर मांडणे गरजेचे आहे.

**नागरी संस्कृतीची संकल्पना :-**

शहरी किंवा नागरी संस्कृतीची संकल्पना उदयास येत आहेत. ज्ञानाचा प्रस्फोट होऊन ग्रामीण जीवनापासून मुक्त होऊन नागरी शहरी व पाश्चात्य संस्कृतीची धारणा अलीकडच्या काळात निर्माण होत आहे.

**संस्कृती तयार होण्यामागची कारणे व पार्श्वभूमी :-**

कोणत्याही धर्माला प्रसिद्ध किंवा मोठे करण्याचे कार्य हे त्यांची तत्वे करतात. विशिष्ट धर्म किंवा जात यांची संस्कृती निर्माण होण्यास मोठा कालावधी लागतो पण एकदा संस्कृती प्रचलित झाली की तिचा बिमोड करणे शक्य होत नाही. मूलभूत तत्वे आणि सद्भावना किंवा सद विचारांचा पाठीराखा होऊन खंबीरपणे संस्कृतीचा विचार अनेक भागात पोहोचण्याचे कार्य केले जाते. समाजात वावरताना अवगुणांचा वापर टाळणे व एकमेकास मदत करणे या छोट्या विचारांचा वारसा पाठीशी घेऊन सत्कार्य करत राहिले तर संस्कृतीची जपवणूक आपोआपच होत राहते.

**भारतीय संस्कृती :-**

भूक लागलेली असताना देखील स्वतः उपाशी राहून इतरांच्या पोटाचा, भुकेचा विचार करणारी भारतीय संस्कृती आहे. सामाजिक नियम, नैतिक मूल्य, परंपरा, श्रद्धा, कलाकृती वेशभूषा, राजकीय व्यवस्था किंवा प्रणाली सोबतच तंत्रज्ञानाचा संग्रह या कलागुणाने ओतपोत भरलेली आहे. भारताच्या संस्कृतीचे दर्शन कोणत्याही एका भागात जाऊन पूर्ण होत नाही तर ही संस्कृती विविधतेने नटलेली आहे व याचा प्रत्येक भारतीयाला अभिमान आहे.

**हिंदू संस्कृती :-**

हिंदू संस्कृती किंवा धर्म हा सर्वश्रेष्ठ मानला जातो कारण यामध्ये पुरुष, स्त्री या दोन्ही लिंगाला समान वागणूक दिली जाते. पुरातन काळापासून चालत आलेल्या प्रथा व परंपरा यांना ही संस्कृती आजही जीवित ठेवण्याचे कार्य

करते. त्याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे 144 वर्षानंतर भरलेले महाकुंभ होय. ही हिंदू संस्कृतीची ओळख आहे.

**महाराष्ट्रीयन संस्कृती :-**

महाराष्ट्रीयन संस्कृती ही शेजारील राष्ट्रांच्या संस्कृतीतील काही भाग आपल्यामध्ये सहभागी करून घेते. शिवाय त्यांच्यावरील उपयोगाचे असलेले व मार्गदर्शक ठरणारी तत्वे या संस्कृतीमध्ये पाचारण करताना दिसतात महाराष्ट्रीय संस्कृतीचा वारसा देखील प्रगल्भ प्रमाणात मोठा आहे.

**वाङ:मयीन संस्कृती :-**

लीळाचरित्र व अग्निपंख पर्यंत किंबहुना अलीकडे प्रकाशित झालेले आत्मचरित्रपर ग्रंथ यांच्या पर्यंतचा प्रवास म्हणजे वाङ्मयीन संस्कृती होय. वाङ्मयाच्या बाबतीत महाराष्ट्र संस्कृती समृद्ध आहे उपदेशपर आणि महत्त्वाच्या तत्त्वावर मार्गदर्शन करणारी गीता भारताची देण आहे.

**नाविन्यपूर्ण कल्पना :-**

संस्कृतीची जोपासना करणे व संस्कृतीच्या माध्यमातून विशिष्ट मूल्यांची आस धरणे हे विद्यार्थ्यांचे आद्य कर्तव्य मानले जाते त्यामुळे प्राथमिक ते महाविद्यालयीन स्तरापर्यंत शिक्षण घेताना संस्कृतीच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण कल्पनांची निर्मिती करणे.

**कार्यात्मक व्याख्या :-**

१) **प्राथमिक स्तर :-** इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचा समावेश ज्या स्तरावर केला जातो तो स्तर म्हणजे प्राथमिक स्तर होय.

२) **संस्कृती :-** नैतिक मूल्य, सदाचाराची शिकवण, मदत व सहानुभूतीची जपवणूक करणारी मूल्य शिकवणारी महत्त्वपूर्ण आणि जबाबदार घटक म्हणजे संस्कृती होय.

३) **जाणीवजागृती :-** चांगल्या विचारापासून दूर न जाऊ देता संस्कृती विषयक आदर्श मूल्यांची जपणूक करण्यासाठी वेळोवेळी केलेले मार्गदर्शन म्हणजे जाणीवजागृती होय.

४) **उपक्रम :-** एखाद्या प्रकल्पाबाबत पूर्ण करण्यासाठी दिलेल्या सूचनांच्या आधारे कृती पूर्ण करणे म्हणजे उपक्रम होय.

**उपक्रम हे प्राथमिक स्तरावरच का ?**

प्राथमिक स्तरावर किंवा माध्यमिक स्तरावर शिक्षण घेणारी मुले ही विचाराने प्रगल्भ झालेली नसतात. त्यांना काय चांगले आणि काय वाईट याच्यातील फरक समजण्यासाठी त्यांची बुद्धी परिपूर्ण विकसित झालेली नसते त्यामुळे इतर समाज विघटकांनी त्यांच्यावर वाईट विचारांचा भडीमार करण्यापूर्वी आपण आपल्या आदर्श संस्कृतीचे पाठ मुलांच्या पुढे वाचत राहिलो तर मुले वाईट बाबी किंवा विचारांना थारा देणार नाहीत. हे वय तीव्र ज्ञान अवगत करणारे असते. या काळात विविध नियम, सूत्रे, मूल्य, विचार, प्रमेय, प्रयोग इत्यादी बाबतीत शिकलेले ज्ञान चिरकाल लक्षात राहते. या काळात चांगल्या किंवा वाईट विचारांची अनुभूती विद्यार्थ्यांना दिली तर त्यांचे ते अनुग्रहण करतात. म्हणून या स्तरावर विद्यार्थी घडतात आणि बिघडतात देखील त्यामुळे घडवायचे का बिघडवायचे, समाज किंवा पिढी यांचे आचरण कशाप्रकारे करायचे याचे विचार करून आपल्या आदर्श संस्कृतीतील मूल्य रुजवण्यासाठी हे वय व स्तर योग्य आहे. म्हणून या काळात विद्यार्थी सतत उपक्रमशील ठेवणे व सजनशील ठेवणे हे पालक व शिक्षकाचे कार्य आहे.

पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण करण्यासाठी मुले या स्तरावर तयार होत असतात. हिंदू संस्कृती सोडून इतर संस्कृतीचे ज्ञान हे यांना समाजविघातक, सोशलमीडिया, टीव्ही, मोबाईल इत्यादीच्या माध्यमातून मिळत असते परंतु त्यांना खतपाणी मिळू न देणारे देण्याचे कार्य आपण हाती घेणे महत्त्वाचे आहे. ते आपण संस्कृतीच्या माध्यमातून करू शकतो.

**उपक्रमांची यादी :-**

१) हस्ताक्षर सुधारणा किंवा हस्ताक्षर स्पर्धा
२) विविध जयंती व पुण्यतिथी
३) वाचन व वकृत्व स्पर्धा
४) आदर्श परिपाठ
५) दिनांकानुसार पाढा
६) चित्रकला, रांगोळी, पेंटिंग, रंगकाम, कापडकाम, भरतकाम कार्यानुभव इत्यादी
७) पर्यावरण विषयक जागरूकता वृक्षरोपण व संवर्धन
८) सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा स्पर्धा ,गायन स्पर्धा, भाषण स्पर्धा इत्यादी
९) वाढदिवस साजरा करणे
१०) भित्तीचित्रे पत्रके तयार करणे
११) निसर्गसहल, वनभोजन, स्वच्छता सप्ताह
१२) वाचन कट्टा, बचत बँक, शब्द बँक
१३) परसबाग निर्मिती
१४) तंबाखू मुक्त शाळा, निबंध स्पर्धा, वर्तमानपत्र वाचन
१५) बाल आनंद मेळावे, प्रवेशोत्सव, समारोप समारोह
१६) हरित शाळा, पक्षांना खाऊ- पाणी
१७) ज्ञानरचनावादी साहित्य, डिजिटल शाळा
१८) विविध तज्ञांचे मार्गदर्शन
१९) आरोग्य शिबिरे
२०) निकाल, पारितोषिके, बक्षीसे

**संस्कृतीची जाणीवजागृती :-**

प्राथमिक स्तरावर असताना जी मूल्य रुजवली जातात ती चिरकाल टिकतात ती चांगली असो किंवा वाईट फारसा फरक या काळात विद्यार्थ्यांना समजत नाही परंतु पालक शिक्षक किंवा थोर या नात्याने संस्कृतीच्या मूल्यांचे स्पष्टीकरण करणे व मुलांच्या मध्ये रुजवण्यासाठी सतत मार्गदर्शन करणे म्हणजे संस्कृतीची जपवणूक आणि जाणीव जागृती होय.

**जाणीव जागृती करण्यामागची कारणे :-**

आदर्श संस्कृतीची जपवणूक करण्यासाठी आणि ती टिकवून ठेवण्यासाठी सतत क्रियाशील राहून संस्कृती

विषयक मूल्य जागरूक ठेवल्याने इतर संस्कृतीचा परिणाम आपल्या आदर्श संस्कृतीवर होत नाही.

**उपक्रमाचा आढावा :-**

वरील यादीप्रमाणे उपक्रमाची माहिती घेऊन प्राथमिक स्तरावर याचे विविध उपक्रम तयार करता येतात. उपक्रमशील शिक्षक अशा विविध उपक्रमाचे आयोजन करून विद्यार्थ्यांना कार्यात्मक ठेवणे व सृजनशील वृत्तीला जागृत करण्याचे काम करतात. वरील यादीतील उपक्रम हे प्राथमिक स्तरांबरोबरच माध्यमिक स्तरावर देखील राबवू शकतात. विद्यार्थ्यांना उपक्रम देऊन त्यांना मार्गदर्शन करत राहणे गरजेचे आहे. उपक्रमामध्ये संस्कृतीची जपवणूक करण्यासाठी निबंध स्पर्धा, वाचन स्पर्धा, लेखन स्पर्धा ,वर्तमानपत्र वाचन वर्तमानपत्रातील संस्कृती विषयक लेख ,कात्रण अशा संस्कृती विषय वृद्धी करण्यासाठी आणि ज्ञानात भर घालण्यासाठी विद्यार्थ्यांसमोर वरील प्रमाणे उपक्रम राबविता येतात. यांचे मूल्यमापन करून त्यांच्या स्पर्धा निर्माण करण्यासाठी बक्षीशांचे आयोजन करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांमधून स्पर्धेनुसार प्रथम द्वितीय आणि तृतीय व प्रोत्साहन पर बक्षीस दिल्याने त्यांच्या स्पर्धा निर्माण होते व ज्ञानात वृद्धी होते. त्यामुळे सर्व स्तरावर अशा उपक्रम व स्पर्धांचे आयोजन करून त्या त्या स्तरानुसार विषयांची निश्चिती करून संस्कृती संवर्धन करणे आणि जाणीव जागृती करणे महत्त्वाचे आहे.

**उपक्रम राबविण्याचा कार्यक्रम :-**

कोणत्याही ऐतिहासिक दिनाचे औचित्य साधून किंवा प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्य दिन, मराठवाडा मुक्ती संग्राम दिन, जयंती, पुण्यतिथी यांचे औचित्य साधून उपक्रम राबविता येतात. शिवजयंतीच्या समारंभावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विषयी संस्कृती विषय जाणीव जागृती करण्यासाठी वेगवेगळया स्पर्धांचे आयोजन करता येते. किंवा संत सेवालाल महाराज जयंती वेळी बंजारा समाजातील उदयोन्मुख नेतृत्व, संस्कृती, सण व उत्सव, गीत, नृत्य, गायन, बोलीभाषेत वकृत्व स्पर्धा इत्यादी उपक्रमाचे आयोजन करून कार्यक्रम राबविता येतात. सोबतच इतर धर्माची जाणीवजागृती निर्माण करण्यासाठी शीख, मुस्लिम, बौद्ध धर्मातील समाज सुधारकांच्या जयंती किंवा पुण्यतिथी येत असतात तेव्हा अशावेळी त्यांच्या धर्मातील प्रथा, परंपरा, वेशभूषा, केशभूषा पेहराव, बोलीभाषेचा वापर आधारित उपक्रम राबवून कार्यक्रमाचे आयोजन करता येते. आशा कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांचे इतर धर्म विषयी आदर निर्माण होतो व संकुचित भावना निर्माण होत नाही.

**सांस्कृतिक खेळ :-**

सांस्कृतिक उपक्रमासोबतच सांस्कृतिक खेळाचे आयोजन करता येते. यांचे आयोजन करून यामध्ये सर्वात शेवटी बक्षीस वितरण समारोह केल्याने विद्यार्थ्यांमध्ये आनंदी व उत्साहाचे वातावरण निर्माण होते. खेळाच्या माध्यमातून प्राचीन कला व मनोरंजन किंवा सांस्कृतिक खेळाचे प्रदर्शन करून त्यातही बक्षीस वितरण केल्याने विद्यार्थ्यांमध्ये संस्कृती विषयक जाणीवजागृती करण्यासाठी रसिखेच निर्माण होते.

**भाषा संवर्धन :-**

भाषिक खेळ, भाषिक कौशल्य, शब्दसंग्रह, शब्दबँक इत्यादींची निर्मिती केल्याने भाषेची वाढ व विकास होतो. दैनंदिन व्यवहारात प्रमाणित भाषेचा वापर केल्याने भाषा सुधारते शिवाय भाषेचे संवर्धन होते. भाषा संवर्धन करण्यासाठी भाषिक खेळ, शब्दांच्या भेंड्या, वाक्यप्रचारांचा वापर, म्हणींचा वापर, वकृत्व स्पर्धा, संवाद कौशल्य, वादविवाद स्पर्धा इत्यादीची स्पर्धेमुळे भाषिक कौशल्य वाढते आणि भाषेचे संवर्धन होण्यास मदत करते.

**भाषिक खेळ :-**

विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा विकास करावयाचा असेल तर भाषिक कौशल्य शिकणे किंवा वृद्धिंगत करणे महत्त्वाचे आहे. कोणतीही भाषा शिकायची असेल तर LSRW एक घटक किंवा कौशल्य आत्मसात केले तर कोणत्याही प्रकारची भाषा अवगत करता येते. त्यामुळे भाषे खेळ हे देखील संस्कृती विषयक जाणीव जागृती करून द्यायला मदत करतात. भाषिक खेळात शब्दांच्या भेंड्या, गावाच्या भेंड्या, नावाच्या भेंड्या म्हणी व वाक्प्रचारात बोलणे वर्तमानपत्राचे वाचन इत्यादी उपक्रम भाषिक खेळात अंतर्भूत होतात. भाषिक खेळाच्या माध्यमातून भाषेचा विकास करता येतो सोबतच मनोरंजन आणि विरंगुळा देखील होतो. त्यामुळे महाविद्यालयीन स्तरावर वाचन प्रेरणा दिन भाषिक पंधरवडा असे विविध उपक्रम/कार्यक्रम राबविताना दिसतात. यामागचा हेतू हाच आहे की भाषेच्या संवर्धनासाठी विविध प्रकारच्या स्पर्धा घेणे व स्पर्धा म्हटले की विद्यार्थ्यांमध्ये एक प्रकारची चुरस निर्माण होते व स्पर्धेच्या माध्यमातून भाषेचा विकास ,विचार करण्याची रुंदी व आवाका वाढतो.

**फायदे :-**

प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना संस्कृती विषयक जाणीव जागृतीसाठी उपक्रमाची निर्मिती केल्याने विद्यार्थ्यांच्या भाषेचा विकास होतो, विचार करण्याची पातळी किंवा स्तर वाढतो आणि उपक्रम पूर्ण करण्याची क्षमता वाढते. भाषेची, संस्कृतीची जोपासना करण्यासाठी विविध कौशल्य निर्माण होतात. त्यांच्या माध्यमातून विद्यार्थी सतत कार्यात मग्न राहतो. सृजनशील व्यक्तिमत्व बनवण्यास मदत होते. आणि सतत कार्यात, उपक्रमात सहभागी राहिल्याने नवोपक्रम करण्याची वृत्ती वाढते. प्राथमिक स्तरावर अशी शिकवण दिल्यास त्यांचा माध्यमिक स्तरावर विकास होतो आणि भविष्यात शास्त्रज्ञ, तज्ञ, सल्लागार, समुपदेशक, मार्गदर्शक, लेखक, कवी, वकील इत्यादी बनायचे कौशल्य आत्मसात करतो. त्यामुळे मुलांचे पाय पाळण्यात दिसतात या युक्तीप्रमाणे प्राथमिक स्तरावर असे उपक्रम राबविताना विद्यार्थी कोणत्या घटकात कौशल्य

प्राप्त करू शकतो व त्याचा त्याला भविष्यात कसा फायदा होऊ शकतो याची बाब शिक्षकांना लक्षात येते. त्यामुळे प्राथमिक किंवा माध्यमिक स्तरावर विद्यार्थ्यांना ज्या ज्ञानाची माहिती दिली गेली आहे त्याच्या सीमा भविष्यात रुंदावतात. त्यामुळे या वयात संस्कृती विषयक मूल्य रुजवण्यासाठी आणि संस्कृतीची जाणीव जागृती करण्यासाठी वरील प्रमाणे विविध उपक्रम राबवून व आणखी नवीन उपक्रमाची यामध्ये भर घालून संस्कृतीची जोपासना करता येते.

**समारोप**:-

प्राथमिक स्तरावर विद्यार्थ्यांना संस्कृती विषयक जाणीवजागृती करण्यासाठी वरील प्रमाणे विविध उपक्रमाचे आयोजन करून ते राबविता येतात. शिक्षकांच्या बुद्धीला पटणारे आणि विद्यार्थ्यांना उपयोगी पडणारे यापेक्षा विविध उपक्रम आपण राबवू शकतो जेणेकरून भाषा विकास, बुद्धी विकास, विचार करण्याची पातळी इत्यादी अनेक गुण किंवा कौशल्य विकसित करण्यासाठी आणि एकंदरीत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टिकोनातून संस्कृती विषयक जाणीवजागृती निर्माण करणे महत्त्वाचे आहे.

**संदर्भग्रंथसूची :-**


१) राठोड मोतीराज - तांडा संस्कृती-अस्मिता प्रकाशन औरंगाबाद

२) राठोड आत्माराम कनिराम (१९९४) गोर बंजारा - गारवट प्रकाशन पुसद

३) पवार रुक्मिणी बाई - बंजारा समाजाच्या शास्त्रीय पद्धतीचा अभ्यास

४) पाटील बळीराम (१९३९ ) - गोर बंजारा लोकांचा इतिहास - देशमुख प्रकाशन अमरावती

५) नाईक मोहन-गोरमाटी संस्कृती आणि संकेत-सोनाली प्रिंटर्स मुंबई, २००१

६) नाईक के. बी-बंजारा सांस्कृतिक शोध-सोनाली प्रिंटर्स मुंबई-२०००

७) कर्वे इरावती-मराठी लोकांची संस्कृती, प्रकाशक आर. जी देशमुख आणि कंपनी, शनिवार पेठ पुणे-१९६२, पृष्ठ क्रमांक १२३

८) शर्मा श्रीराम – बंजारा समाज, दक्षिण प्रकाशन, गांधी बाजार हैदराबाद, १९८०

९) राठोड मोतीराज - गोर बंजारा वंशाचा इतिहास, सौ.लता देवी नाईक, मुख्य विश्वस्त, पद्मश्री राम सिंग भानावत मेमोरियल ट्रस्ट काबेरी ठाणे पूर्व २००९

१०)पाटील बळीराम हिरामण गोर बंजारा लोकांचा इतिहास बळीराम पाटील स्मारक समिती, यवतमाळ प्रथम आवृत्ती (पुनमूद्रण १९७३.